# भावसार समाज, धुळे.

## संस्थेची घटना.

भाग १ : घटना.

भाग २ : संस्थेचे नांव, उद्देश, कार्यक्षेत्र, कार्यालय, वर्ष, संलग्न मंडळे, वार्षिक उत्पन्न, वार्षिक खर्च.

भाग ३ : संस्थेचे सभासद त्यांचे हक्क, कर्तव्य सभासदांची वर्गणी, सभासदांची अपात्रता.

भाग ४ : आमसभा.

भाग ५ : विश्वस्त मंडळ [ ट्रस्ट मंडळ ].

भाग ६ : कार्यकारी मंडळ.

भाग ७ : पदाधिकारी.

भाग ८ : निवडणूक.

भाग ९ : घटना दुरुस्ती.

भावसार समाज, धुळे घटना।
-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

भाग पहिला।

घटना :- भावसार समाज, धुळे च्या उन्नती साठी केलेली घटना।

भाग दुसरा।

संस्थेचे नांव, उददेश, कार्यक्षेत्र, कार्यालय, वर्ष, संलग्न मंडळ, वार्षिक उत्पन्न व वार्षिक खर्च।

[१] संस्थेचे नांव :- "भावसार समाज, धुळे". असे राहिल।

[२] उददेश :- [१] समाजातील लोकांत सहकार्य व संघटन वाढविणे।

[२] ही संस्था सभासदांची बनलेली असेल। व संस्थेचे विशेष फायदे सभासदांनाच मिळतील।

[३] समाजाच्या मालकीच्या स्थावर व जंगम मिळकतीचे जतन, संरक्षण व संवर्धन करणे व त्या पासून उत्पन्न मिळविणे।

[४] समाजातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणांस आर्थिक मदत करणे।

[५] समाजातील तरुण वर्गाची संघटना करुन त्यांच्या कडून समाजाच्या उन्नतीस पोषक असे कार्यक्रम घडवुन आणणे।

[६] समाजातील अडचणी सोडविणे, आपसातील तंटे, वाद मिटविणे।

[७] ही संस्था राजकारणापासुन अलिप्त असेल।

[८] निराश्रीतांना आर्थिक मदत करणे।

...२/-

[९] आवश्यकतेनुसार, निरनिराळ्या योजना आखून
समाजाची सर्वांगीण उन्नती करणेचा प्रयत्न करणे.

[१०] समाजातील कुलदेवता "श्रीहिंगुलांबिका देवी माता"
हींची नियमित सेवा करणे व तिचे नवरात्र उत्सव
उत्साहाने पार पाडणे.

[३] कार्यक्षेत्र :- धुळे नगर पालिकेची जी हद्द असेल ते या संस्थेचे कार्यक्षेत्र
राहिल.

[४] कार्यालय :-भावसार क्षत्रिय समाजाचे कार्यालय हे पंच संस्थेचे
[समाजाचे] कार्यालय राहिला व त्याचा पत्ता -
[illegible]

[५] वर्ष :- संस्थेचे कामकाजाचे वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर
असे राहिल.

[६] संलग्न मंडळे :- [१] भावसार युवक मंडळ.
[२] महिला मंडळ.
[३] संस्थेच्या आमसभेचे वेळोवेळी निर्मिलेली
इतर मंडळे.

[७] वार्षिक उत्पन्न :[१] वर्गणी रूपाने [२] देणगी रूपाने.
[३] मिळकती पासून [४] व्याज व इतर
मिळणारे भाडयाचे [५] सभासद फी, उत्पन्न
[illegible] पट्टी, देवीची वर्गणी इ.

[८] वार्षिक खर्च :- स्टेशनरी, टपाल व छपाई खर्च, संस्था हाती
घेईल. त्यासाठी लागणारा आवश्यक खर्च,
सेवकांचे वेतन, मानधन, बांधकाम, स्थावर व
जंगम मिळकतीची दुरुस्ती, शैक्षणिक खर्च,

म्युनिसिपल कर, सरकारी कर, प्रवास खर्च, ऑडीट फी इ. संस्थेच्या इतर विधायक हेतु साठी होणारा खर्च.

## भाग तिसरा.

संस्थेचे सभासद, त्यांचे हक्क, त्यांची कर्तव्ये, त्यांची वर्गणी, सभासदांची अपात्रता.

[१] सभासद :- भावसार जातीतील कोणत्याही स्त्री व पुरुषाला, संस्थेचे सभासद होता येईल. मात्र त्याचे वय किमान [illegible] वर्षे पूर्ण असावे, व किमान सहा महिने तो समाजाचे कार्यक्षेत्रांत स्थायिक असला पाहिजे.

[२] वर्गणी :- संस्थेची वार्षिक वर्गणी रु. १०/-, रु. १०१/- एकदम फी देणा-यांस आजीव सभासद समजण्येत येईल. [मात्र ही घटना लागू होण्यापूर्वी जे आजीव सभासद झाले आहेत. ते आजीव सभासद म्हणून राहतील.]

[३] कर्तव्ये :- संस्थेच्या घटना व नियमाप्रमाणे आमसभा, ट्रस्ट मंडळ, कार्यकारी मंडळ वेळोवेळी जे धोरणात्मक ठराव पास करतील, त्या प्रमाणे सभासदांनी वागण्याचे मान्य केले पाहिजे. मात्र कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेले ठराव पुढील आमसभेत मंजूरी घेतल्याशिवाय अंमलात आणु नये.

कोणत्याही सामाजिक कार्यात भाग घेऊन शारीरिक व आर्थिक मदत करणे.

[४] हक्क :- १] प्रत्येक सभासदांस समाजाविषयी व पंच

...४/-

विषयी आपले विचार भाषणाव्दारे किंवा लिखाणा व्दारे व्यक्त करता येईल. मात्रदयांत व्यक्तिगत टिका नसावी.

२] संस्थेच्या कामकाजाविषयी विचारपूस करणे, योजना त्या सूचना करणे, अध्यक्षांचे अनुमतीने सभेत ठराव मांडणे.

३] संस्थेचे लेखी कागदपत्र व जमाखर्च संस्थेच्या अध्यक्षांच्या लेखी परवानगीने सभासदांस पाहता येईल.

४] कार्यक्षेत्रांतील समाजाचे सर्व घटकांनी संस्थेचे सभासद होणे.

[५] आपत्रता :- एखादया सभासदाने समाजास बाध करणारे किंवा घटनेच्या नियमाविरुध्द वर्तन केले आहे. अशी शिफारस कार्यकारी मंडळाकडून आल्यास किंवा त्याने तसे वर्तन केले आहे. अशी आमसभेच्या हजर असलेल्या सभासदापैकी दोन तृतीयांश सभासदांची खात्री होवून, जर त्यांनी त्याचे सभासदत्व रद्द करणारा ठराव पास केला. तर त्या वेळेपासून एक वर्षा करता त्याचे सभासदत्व रद्द होईल. असा सभासद जर एखादया अधिकार पदावर असल्यांस त्याने त्याचेकडे असलेल्या कागदपा चार्ज तावडतोब संबंधीत अधिका-यांकडे दिला पाहिजे. वरील एक वर्षाची मुदत संपण्यापुर्वीच सभासदत्व रद्द झालेल्या इसमाने माफीचा अर्ज केल्यास व आमसभेत तो अर्ज योग्य वाटल्यास आमसभा बहुमताने त्यास परत सभासदत्व करुन घेईल.

## भाग चवथा.

[१] या संस्थेच्या सभासदांची आमसभा बनेल.

[२] अ]. वार्षिक आमसभा प्रत्येक वर्षाचे जुन महिन्यांत घेतली जाईल. त्या आमसभेत कार्यकारी मंडळाकडून संपलेल्या वर्षाचा कामाचा अहवाल, जमाखर्च, तेरीज, ताळेबंद अंतर्गत व सरकारी ऑडीट रिपोर्ट सहीत सादर केला जाईल. तसेच पुढील वर्षाचे अंदाज पत्रक [बजेट] सादर केले जाईल. कार्यकारी मंडळाकडून आलेल्या शिफारशी वर निर्णय घेईल. संलग्न संस्थांचे आर्थिक रिपोर्ट व अहवाल सादर करणेत येतील.

ब] १] अंतर्गत ऑडीट :-

या आमसभेत नवीन वर्षासाठी अंतर्गत ऑडीटरची नेमणुक करण्यांत येईल. त्यांनी आर्थिक वर्ष संपल्यानंतर एक महिन्याचे आंत म्हणजे एप्रिल मध्ये रिपोर्ट दिला पाहिजे.

२] आमसभा सरकारी लेखा परीक्षणासाठी चार्टर्ड अकौंटंटची नेमणुक करेल. त्यांनी आर्थिक वर्ष संपल्यानंतर व अंतर्गत लेखा परीक्षण झाल्यावर ताबडतोब [ शक्य तोवर मे महिन्याचे अखेर ] ऑडीट करून अहवाल दिला पाहिजे. व तो आमसभेपुढे ठेवणेत यावा.

३] दुसरी आमसभा नवरात्र महोत्सवाचे अगोदर एक महिना घेणेत यावी. या आमसभेत नवरात्र महोत्सवाची रुपरेषा, पूजे बद्दल दयावयाचा मान/ लिलाव इ. ठरविणेत यावे.

४] कार्यकारी मंडळ किंवा ट्रस्ट मंडळास आवश्यकता वाटल्यास त्या प्रमाणे अध्यक्ष "विशेष आमसभा" बोलवतील.

५] कार्यकारी मंडळाने किंवा ट्रस्ट मंडळाने आमसभा बोलावण्याची मागणी केल्यास अध्यक्षांनी १५ दिवसांचे आंत आमसभा घेतली पाहिजे.

६] सभेचे कामकाज अध्यक्ष चालवतील. ते गैरहजर असल्यांस

...६/-

उपाध्यक्ष व दोन्ही गैरहजर असल्यास हजर सभासदांतून तात्पुरता अध्यक्ष निवडून सभेचे कामकाज चालवावे.

७] कोरम - आमसभेच्या बैठकीचा कोरम पदावरील संख्येच्या १/३ किंवा २५ या दोन्ही पेक्षा जी संख्या लहान असेल तेवढा राहिल.

८] तहकूब सभा - सक्युलर [परिपत्रक] मध्ये नमूद केलेल्या वेळे पासून एक तासाच्या बैठकीचा कोरम न झाल्यास, हजर सभासदांनी एक तासानंतर आमसभेचे कामकाज सुरु करावे.

९] कोरमच्या अभावी तहकूब झालेल्या बैठकीस कोरमची आवश्यकता नाही.

१०] हरकतीचा मुददा - आमसभेतील हजर सभासदाने चालू विषयाला धरून केव्ही हरकतीचा मुददा [पॉईंट ऑफ ऑर्डर] मागता येईल. अशा बाबतीत सभेचा अध्यक्ष होय किंवा नाही असा निर्णय देईल. व तो निर्णय अंतिम राहिल.

११] मत - प्रत्येक सभासदांस ठरावावर एक मत देता येईल. अध्यक्षांना आवश्यकता वाटल्यास एखाद्या ठरावावर गुप्त मतदान घेता येईल.

१२] पोल - सभेतुन दोन सभासदांनी पोल मागितल्यास प्रोसिडींग बुकांत कोणत्याही ठरावावर अनुकूल, प्रतिकूल, तटस्थ मते इ. ची नोंद करणेत येईल.

१३] कर्जे - धंदयाकरीतां किंवा व्यवहाराकरीतां कर्जे देण्यांत येवू नयेत. संस्थेच्या हितासाठी किंवा विकासासाठी आमसभेच्या परवानगीने ट्रस्ट मंडळ किंवा कार्यकारी मंडळ योग्य त्या दराने कर्जे काढतील.

१४] कार्यक्रम पत्रिका [सक्युलर] आमसभेची कार्यक्रम पत्रिका १५ दिवस आधी संस्थेच्यानोटीस बोर्डावर लावण्यांत येईल. सभेच्या ४८ तास आधी सर्व सभासदांना कार्यक्रम पत्रिका मिळण्याची व्यवस्था

करण्यांत येईल. मात्र तातडीच्या किंवा विशेष आमसभेची कार्यक्रम पत्रिका ७ दिवस आधी काढावी.

सदर आमसभेतील विषया संबंधी आमसभा जाहिर झाल्यापासुन त्याचे कार्यदपत्र व माहिती कार्यालयांत सर्व सभासदांना कार्यालयीन वेळांत पहावयास मिळेल.

## भाग पांचवा.

द्रस्ट मंडळ - विश्वस्त मंडळ.

[१] विश्वस्त मुंडळ तीन सभासदांचे आहे. ऽ।२।८

[२] विश्वस्त मंडळाची मुदत ५ वर्षे असेल. द्रस्ट मंडळाच्या सभासदांपैकी कोणत्याही व्यक्तीला राजीनामा द्यावयाचा असल्यांस त्यांनी तो आमसभेपुढे पाठवावा. तेथेच तो मंजुर होईल. मात्र द्रस्ट प्रमुखाला राजीनामा द्यावयाचा असल्यास तो त्यांनी अध्यक्षांकडे द्यावा. व अध्यक्षांनी त्याचा निर्णय आमसभा बोलावुन घ्यावा.

[३] द्रस्ट मंडळ आपल्यातुन एक "द्रस्ट प्रमुख" म्हणुन निवडेल.

[४]. द्रस्ट मंडळाच्या जागेसाठी उभे राहणाऱ्या उमेदवाराची पात्रता -

१] तो आजीव सभासद असावा.

२] त्याचे वय किमान ४० वर्षे असावे.

३] तो साक्षर असावा.

४] त्याने कार्यकारी मंडळावर काम केलेले असावे. तसेच त्याला कार्यकारी मंडळावरुन काढलेले नसावे.

[५] द्रस्टीची निवडणूक संस्थेचे सभासद गुप्त मतदान पध्दतीने करतील.

[६] स्थावर जंगम इस्टेटीच्या खरेदीविक्री बाबत आमसभा जो निर्णय घेईल. त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी विश्वस्त मुंडळावर राहिल.

[७] एका वेळेस रु. ३०००/- पेक्षा अधिक जंगम मालाची खरेदी विक्री किंवा इतर खर्चाचा निर्णय द्रस्ट मंडळ व कार्यकारी मंडळ यांचे संयुक्त सभेत घेणेत

यावा. फक्त संयुक्त सभेत कार्यकारी मंडळाच्या कोरम शिवाय किमान दोन विश्वस्त [ट्रस्टी] हजर असले पाहिजे. मात्र एकच विषय दोन वेगवेगळ्या सभेत घेऊनही दोन्हीही सभेस एकही ट्रस्टी हजर न झाल्यास पुढील सभेत कार्यकारी मंडळ अशा विषयावर निर्णय घेऊ शकेल.

[८] ट्रस्ट मंडळाचे अधिकार -

१] ट्रस्ट मंडळ कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवेल. समाजाची सुधारणा होणेसाठी ट्रस्ट मंडळ कार्यकारी मंडळाला मधून-मधून आदेश देईल वत्या आदेशाप्रमाणे वागण्याचे बंधन कार्यकारी मंडळावर राहिल.

२] वर्ष संपल्यावर दोन महिन्याचे आंत आमसभेपुर्वी संपलेल्या कामकाजाचे वर्षाचे तेरीज ताळेबंदासहीत जमाखर्च अंतर्गत लेखा परीक्षण व सरकारी लेखा परीक्षणा कडून ऑडीट करून घेऊन ऑडीट रिपोर्ट सहीत ट्रस्ट मंडळाने कार्यकारी मंडळा कडून मागवावे.

३] समाजाच्या मालकीच्या इस्टेटीपैंकी कांही मोठी दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम करावयाचे असेल. त्यावेळी कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, ट्रस्ट मंडळ, कार्यकारी मंडळ, त्यांची संयुक्त सभा बोलावतील. या सभेत कार्यकारी मंडळास सल्ला देणे व मार्गदर्शन करणे असे ट्रस्ट मंडळाचे काम राहिल.

[९] ट्रस्ट मंडळाचे विविध अधिकार -

अ] आमसभा किंवा संस्थेची संबंधीत इतर कोणत्याही सभेचा निर्णय व ठराव संस्थेच्या हित संबंधास बाधा आणणारा आहे असे दोन किंवा अधिक ट्रस्टीची खात्री झाल्यास तो ठराव किंवा निर्णय ते तात्काळ स्थगित करु शकतील. ट्रस्टींच्या गैरहजेरीतील सभेतही अशा अर्थाचा ठराव किंवा निर्णय ट्रस्ट मंडळ त्यांच्या सभेत निर्णय घेऊन ट्रस्ट मंडळाच्या [illegible] स्थगित करु शकतील.

ब] कार्यकारी मंडळाचे कार्य संस्थेच्या घटनेला सोडून नियमबाह्य व असमाधानकारक होत आहे असे दिसून आल्यास ट्रस्ट मंडळ बहुमताने ...

कार्यकारी मंडळास बरखास्त करता येईल. यासाठी ट्रस्ट प्रमुखाने ट्रस्ट मंडळाची सभा बोलावली पाहिजे. मात्र यासाठी कार्यकारी मंडळाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे.

[१०] ट्रस्ट मंडळाच्या सभासदांपैकी एखादा सभासद दिवंगत झाल्यास किंवा त्याने राजिनामा दिल्यास किंवा इतर कारणांमुळे जागा रिकामी झाल्यास त्या जागेची निवडणूक मतदार सभासद नियमाप्रमाणे गुप्त मतदान पध्दतीने करतील. अशी निवडणूक ही जागा खाली झाल्यापासून ९० दिवसांचे आंत करावी. सदर निवडणूकीचा कार्यक्रम कार्यकारी मंडळाने ठरवावा. [निवडणूक पंच कमेटी नेमणे, तारीख वगैरे].

[११] अपात्रता :- ट्रस्ट, प्रमुख किंवा ट्रस्ट सभासद यांचे कडून घटनेचा भंग झाल्यास किंवा नियम बाहय काम केल्यास, किंवा आपल्या अधिकार पदाचा दुरुपयोग अगर गैरवापर केला असे सिध्द झाल्यास किंवा मागील कागदपत्रके पूर्णपणे ताब्यात दिली नसल्यास अशा ट्रस्टीची आमसभेत बहुमताने ट्रस्टीपद रद्द करता येईल. ट्रस्टीस आपली बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार राहिल.

## भाग सहावा.

### कार्यकारी मंडळ.

[१] संस्थेच्या सभासदांनी गुप्त मतदान पध्दतीने निवडून दिलेल्या किंवा नियमाने स्विकृत झालेल्या सभासदांचे कार्यकारी मंडळ बनेल.

[२] कामे व अधिकार :-

अ] सामाजिक रूढी, परंपरा आणि घटनेतील नियम यांना अनुसरून संस्थेचा कारभार चालविणे.

ब] संस्थेच्या सर्व संलग्न मंडळांवर कार्यकारी मंडळाचे अंतिम नियंत्रण राहिल. तथापि त्या संलग्न मंडळांना इतर नियमानुसार समाज कार्य करण्यास त्यांना स्वतंत्र्य राहिल.

[३] समाजाच्या मालकीच्या स्थावर व जंगम मिळकतीवर ताबा ठेवणे व

देखरेख ठेवणे.

[४] समाजाचे पंच बाब, देणग्या, भाडयाचे उत्पन्न वसूल करणे. तसेच थकबाक्या वसूल करणे. मात्र तडजोड अगर माफ करावयाचे असल्यास किंवा कायदेशीर इलाज करावयाचा असल्यास त्याचा निर्णय ट्रस्ट मंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या संयुक्त सभेत घेण्यांत येईल.

[५] अंदाज पत्रकाप्रमाणे खर्च करणे, शेकडा वीस टक्के जादा खर्च करण्याचा अधिकार असेल.

[६] समाजातील सभासदांकडे एखादे कार्य असल्यास ते पार पाडण्यास सहाय्य करणे. तसेच समाजातील तंटे, वाद व मतभेद मिटविणे, तक्रारीचे निवारण करणे व अडचणी सोडविणे.

[७] इस्टेटीची दुरुस्ती करणे व त्यासाठी होणारा खर्च करणे.

[८] कार्यकारी मंडळ सामुदायिकरित्या व व्यक्तीशः आमसभेस जबाबदार राहतील.

[९] आवश्यक तो नोकर नेमणे व दूर करणे.

[१०] जमाखर्च, तपासणे व ऑडीट रिपोर्टचा विचार करणे.

[११] सभासदांना कामकाजाविषयी माहिती देणे.

[१२] निरनिराळ्या कामासाठी उपसमित्या नेमणे अथवा रद्द करणे.

[१३] जमाखर्चास मंजूरी देणे.

[१४] रिकाम्या झालेल्या जागी दुसरा सभासद नेमणे व त्यास पुढील होणा-या आमसभेस मान्यता हवी.

[१५] समाजाच्या कार्याच्या दृष्टीने घटनेला विसंगती येणार नाही. असे नियम कार्यकारी मंडळास करता येतील. मात्र पुढील आमसभेत त्यास मंजूरी घेतली पाहिजे. असे नियम आमसभेत मंजूर झाल्याशिवाय त्यांची अंमलबजावणी करता येणार नाही.

[१६] वार्षिक अहवाल, तेरीज, ताळेबंद, वार्षिक सभेच्या १५ दिवस अधि सभासदांना संस्थेच्या ऑफिसांत पहाता येतील.

[१७] संलग्न मंडळाकडून त्यांचे वार्षिक अहवाल, जमाखर्च, तेरीज, ताळेबंद इ. मागविणे.

[१८] मासिक सभा - महिन्यांतुनकिमान एक कार्यकारी मंडळाची सभा भरविण्यांत येईल. या सभेत झालेल्या कामकाजाच्या आढावा इ. व पुढे करावयाच्या कामकाजाची रुपरेषा ठरविली जाईल.

[१९] विशेष सभा - कार्यकारी मंडळाच्या पांच सभासदांनी आपल्यां सही निशी लेखी मागणी अध्यक्षांकडे केल्यास, त्यांनी कार्यकारी मंडळाची सभा १० दिवसांत घेतली पाहिजे.

[२०] कामकाज - सभेचे कामकाज अध्यक्ष, चालवतील. ते गैरहजर असल्यास उपाध्यक्ष व दोन्हीही गैरहजर असल्यांस सभासदांकडून तात्पुरता अध्यक्ष नेमूण त्या सभेचे कामकाज चालवावे.

[२१] कार्यकारी मंडळाचा कोरम पांच सभासदांचा राहिल.

[२२] तहकूब बैठक - भाग ४, नियम ८ प्रमाणे.

[२३] मत - प्रत्येक सभासदांस ठरावावर एक मत देता येईल. समान मते पडल्यास अध्यक्षांना एक जादा मत [कॉस्टींग व्होट] देण्याचा अधिकार राहिल.

[२४] सभासदांची गैरहजेरी - कार्यकारी मंडळाचा एखादा सभासद सतत तीन बैठकींना गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व शो-कॉज नोटीस देवुन रद्द करण्यांत येईल. मात्र -

अ] त्यास बैठकीचे लेखी आमंत्रण मिळाले असले पाहिजे.

ब] तो सभासद आजारी नसावा.

[२५] राजिनामा - कार्यकारी मंडळाच्या कोणाही सभासदांस राजिनामा द्यावयाचा असल्यास त्याने तो अध्यक्षांकडे सादर करावा. त्या राजिनामाचा निर्णय कार्यकारी मंडळाने करावा. अध्यक्षांना राजिनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी तो सचिवांकडे द्यावा. सचिवांने अध्यक्षांच्या राजिनाम्याचा निर्णय ट्रस्ट मंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यासंयुक्त सभेत घ्यावा.

...१२/-

[२६] समाजाच्या किंवा संस्थेच्या विशीष्ट कार्यासाठी कार्यकारी मंडळ खास समिती नेमूण ते कार्य पार पाडण्याची जबाबदारी त्याचिवर टाकु शकेल.

[२७] ज्या कामासाठी समिती नेमली असेल. त्या समितीने त्याचे कार्य संपल्यावर सर्व अहवाल व जमाखर्च १५ दिवसांचे आंत कार्यकारी मंडळास दिला पाहिजे.

[२८] सदरचे अहवालास मंजुरी मिळे पर्यंत त्या समितीचे अस्तित्व राहिल.

[२९] ज्या कामासाठी समिती नेमली असेल. त्या कामाचा संबंध जर एखादा खात्याच्या कार्यकारी मंडळातील अधिका-यांकडे पोहचत असेल. तर तो त्या समितीचा पदसिध्द अध्यक्ष असेल. तसेच समितीने आपला सचिव समितीतुनच निवडावा.

[३०] समितीने ठरविलेल्या मुदतीत आपले काम पार न पाडल्यास कार्यकारी मंडळ किंवा आमसभा योग्य तो निर्णय घेऊ शकेल.

[३१] ठरावाचा फेरविचार - कार्यकारी मंडळाने केलेल्या ठरावापैकी जर एखादा ठराव घटनेला विसंगत किंवा समाज हिताच्या दृष्टीने घातक आहे. असे कार्यकारी मंडळाने १/३ सभासदांच्या सहीने केली याची आम्हास तो ठराव घालुन घेण्यासाठी १५ दिवसांचे आंत या ठरावाचा फेरविचार करता येईल. अशाठरावाच्या फेर विचाराचा निर्णय होईपर्यंत अशा ठरावाची अंमलबजावणी करता येणार नाही.

[३२] समाजाचा सर्व पैसा "भावसार क्षत्रिय समाज, धुळे" या नावाने बँकेत खाते उघडून ठेवावा.

[३३] बँकेतून पैसे चेकने काढतांना अध्यक्ष व अकौंटंट यांच्या संयुक्त सहीने काढावा. यापैकी एखादा गैरहजर असल्यास त्याचे ऐवजी सचिवाने सही करावी.

...१३/-

## भाग सातवा.

### पदाधिकारी.

[१] अध्यक्ष, [२] उपाध्यक्ष, [३] सचिव, [४] [illegible], [५] खाते व त्यावरील अधिकारी -

[१] अध्यक्ष:- कामे व अधिकार -

१] प्रत्येक खात्याच्या कारभारावर देखरेख ठेवणे.

२] सहका-यांस सल्ला देणे व त्यांच्या कामकाजांत मदत करणे.

३] कार्यकारी मंडळाची सभा बोलविणे, मंडळाच्या किमान पांच सभासदांनी लेखी मागणी केल्यास दहा दिवसांचे आंत सभा बोलाविणे.

४] अध्यक्ष या नात्याने कार्यकारी मंडळाची सभा चालविणे.

५] सभेत एखादा विषय चर्चेसाठी घेण्यांस परवानगी देणे अगर नाकारणे.

६] कार्यकारी मंडळ व्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीस सल्ला मसलतीसाठी अमंत्रण करून बोलाविणे. कार्यकारी [illegible] आवश्यकतेनुसार सल्लामसलतीसाठी बोलाविणे.

७] सभेचे नियम तोडल्यास एखाद्या सभासदांस अगर सभासदा व्यतिरिक्त इसमास सभा सोडून जाण्यांस सांगणे.

८] सभासदास कामाची माहिती देणे.

९] एखाद्या प्रसंगी कार्यकारी मंडळाने न ठरविलेली एखादी आवश्यक गोष्ट आपल्या सहकारी सभासदांचे तोंडी संमतीने अंमलात आणणे. मात्र लगेच ही गोष्ट सभेत मांडून त्यास अध्यक्ष मान्यता मिळवितात.

१०] समाजाच्या स्थावर व जंगम मिळकतीपरमुखत्यार म्हणून ताबा व देखरेख ठेवणे.

११] समाजातील बांधवाकडे असलेल्या [illegible] समाजाचा प्रमुख [illegible] भाग घेणे.

१२] कार्यकारी मंडळातील एखादे खात्याचे कामकाज समाधानकारक होत नसल्यास त्या खाते प्रमुखाकडून त्याच्या खात्याचा राजिनामा

अध्यक्ष मागू शकतील. खाते प्रमुखाने तो दिला पाहिजे. असा राजिनामा खाते प्रमुखाने न दिल्यास त्याचे खाते त्याचे कडून अध्यक्ष काढून घेऊन त्यावर दुसरे खाते प्रमुख नेमतील.

१२] कार्यकारी मंडळ समाजाचे कामकाज सांभाळण्यास असमर्थ आहे असे कार्यकारी मंडळातील किमान सात सभासदांचे मतैक्य झाल्यास कार्यकारी मंडळाने सामुदायिक राजिनामा ट्रस्ट मंडळाकडे दिला पाहिजे. असे कार्यकारी मंडळ बरखास्त झालेनंतर ट्रस्ट मंडळ नवीन निवडणूक सहा महिन्याचे आंत घेतील. तो पर्यंत ट्रस्ट मंडळ सर्व कारभार स्वतः किंवा एखादी कार्यवाहू समिती नेमून पाहिल.

[२] उपाध्यक्ष :-

१] अध्यक्ष सांगतिल त्या प्रमाणे त्यांचे कामांत मदत करणे.

२] अध्यक्षांचे गैरहजेरीत त्यांची कामे पहाणे.

[३] सचिव :-

१] नोकर वर्गाच्या कामावर देखरेख ठेवणे.

२] ट्रस्ट मंडळ, कार्यकारी मंडळ किंवा आमसभा यांचे बैठकीत आमंत्रण पत्रक [सर्क्युलर/अजेंडा] संबंधीत अधिकाऱ्यांच्या संमतीने तयार करणे.

३] सदर आमंत्रण पत्रक सभासदांना पोहचविण्याची व त्यावर सह्या घेण्याची व्यवस्था करणे.

४] प्रत्येक आमंत्रण पत्रिकेची तारीख, वेळ, स्थळ व विषयांची यादी इ. गोष्टी स्पष्टपणे लिहाव्यात.

५] नियमाप्रमाणे ज्याचे सभासदत्व रद्द होत असेल त्यांची नांवे कार्यकारी मंडळाच्या सभेत मांडून त्या बद्दल योग्य तो निर्णय घेणे.

६] ट्रस्ट मंडळ, कार्यकारी मंडळ आणि आमसभा यांचे बैठकीचे कच्चे प्रोसिडींग लिहिणे व ते पक्के लिहून पुढील बैठकीस मंजूरीस मांडणे.

...१५/-

७] संस्थेचे खिजाण करणें, महत्त्वांची कागदपत्र व दस्तऐवज सुरक्षित सांभाळणे.

८] सभेच्या वेळी आवश्यक ती माहिती व कागदपत्र हजर करणे.

९] सभासदांकडून आलेल्या सूचना, तक्रारी अर्ज वगैरे पत्रव्यवहार संबंधीत मंडळापुढे मांडून त्यावर निर्णय घेणे.

१०] संस्थेचे ऑफिस सामान डेडस्टॉक ताब्यात ठेवणे व त्याची नोंद घेणे.

११] समाजाची आवश्यक ती माहिती व आकडेवारी संग्रही ठेवणे.

१२] आवश्यक तो पत्रव्यवहार करणे व नोटीसा देणे.

[४] लेखापाल / अकौंटंट :-

१] संस्थेचा जमाखर्च ठेवणे व योग्य त्यावेळी ऑडीट करून घेणे.

२] संस्थेचे कागदपत्र, जमाखर्च जर एखाद्या सभासदाने पहावयास मागितल्यास ते दाखविणे.

३] संस्थेचा वार्षिक अहवाल आणि तेरीज ताळेबंद तयार करणे व कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पास करून नंतर आमसभेत मंजूरीसाठी मांडणे.

४] लाईट [बीज] बील, पगार, म्युनिसिपल टॅक्सवगैरे न टाळता येणारा दैनंदिन खर्च अकौंटंट यांनी करावा.

५] संस्थेच्या घेणे व देणे संबंधीच्या याद्या सचिवाला व अध्यक्षांना वेळोवेळी देणे.

६] एकावेळी जास्तीत जास्त रु. १००/- खर्च करता येतील. व रु. ५००/- पेक्षा जास्त शिल्लक हातात ठेवु नये.

[५] खाती व त्यावरील अधिकारी -

[१] भांडी व डेडस्टॉक, खानेसुमारी २] विद्यार्थी फंड - शिक्षण खाते ३] देवी खाते ४] वसुली खाते.

१] प्रत्येक खात्यावर कार्यकारी मंडळ, कार्यकारी मंडळातून किंवा तशी आवश्यकता वाटल्यास आमसभेच्या सभासदांमधून अधिकारी

नेमले जातील. त्या अधिका-याने आपआपल्या खात्यावर देखरेख ठेऊन वेळोवेळी कार्यकारी मंडळाकडे रिपोर्ट द्यावा.

२] कार्यकारी मंडळात त्या खात्यासंबंधी जे निर्णय घेतले जातील. त्यांची अंमलबजावणी करणे.

३] कार्यकारी मंडळास जी माहिती लागेल ती पुरविणे.

४] खात्यात ज्या काही नवीन सुधारणा किंवा नवीन गोष्टी सुरु करावयाच्या असतील त्यास प्रथम कार्यकारी मंडळातून मंजूरी घेतली पाहिजे.

[७] अंतर्गत लेखा परीक्षण :- [ इंटर्नल ऑडीट ].

१] संस्थेचे व तिचे संलग्न संस्थांचे जमाखर्च तपासुन त्यांचे ऑडीट रिपोर्ट आमसभेपुढे ठेवणे साठी अध्यक्षांकडे देणे.

२] आमसभेने नेमलेल्या ऑडीटरने राजिनामा दिल्यास किंवा काही अडचणीमुळे जमाखर्च ऑडीट करुन घेणे अशक्य झाल्यास सचिवाने ही बाब कार्यकारी मंडळापुढे मांडून दुस-या ऑडीटरची निवड कार्यकारी मंडळाने करुन घ्यावी. व त्यांचे कडून जमाखर्च ऑडीट करुन घ्यावे. अशा नेमलेल्या ऑडीटरची पुढील आमसभेत मंजुरी घ्यावी.

३] ऑडीटर हा कार्यकारी मंडळाचा सभासद नसावा.

## भाग आठवा.

### निवडणूक.

[१] कार्यकारी मंडळाची निवडणूक दर तीन वर्षांनी गुप्त मतदान पध्दतीने घेतली जाईल. मावळत्या कार्यकारीणीची मुदत संपण्याचे आंत नवीन कार्यकारीणीची निवडणूक घ्यावी व १ एप्रिलला नवीन कार्यकारी मंडळाने चार्ज घ्यावा.

[२] काही अनपेक्षीत अडचण आल्यास अशी निवडणूक मावळत्या कार्यकारीणीची मुदत संपल्यावर [जास्तीत जास्त] कमाल दोन

...१७/-

महिन्यांनी होऊ शकेल. तो पर्यंत जुन्या कार्यकारीणीने ट्रस्ट मंडळाच्या मंजुरीने काळजीवाहू कार्यकारीणी म्हणून काम बघावे.

[३] कार्यकारी मंडळाच्या ११ सभासदांच्या जागेकरीता निवडणूक संस्थेचे मतदार गुप्त मतदान पध्दतीने करतील.

[४] कार्यकारी मंडळाचे निवडणूकीत उभे राहणा-या उमेदवाराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे. व तो आजीव सभासद असावा.

[५] संस्थेचे जेसभासद असतील तेच मतदार असतील. मात्र ज्या तीन वर्षांकरिता कार्यकारीणीची निवड होणार असेल. त्या आधीच्या तीन वर्षांची सभासद फी त्या [आधीच्या] तीन वर्षांकी शेवटच्या वर्षाच्या जानेवारी ३१ पर्यंत भरली पाहिजे.

[६] ट्रस्ट मंडळ, कार्यकारी मंडळ, भावसार युवक मंडळाची कार्यकारीणी ह्यांच्या सभासदांचे जागेपैकी कुठल्याही एका पेक्षा जास्त जागेवर कुणालाही रहाता येणार नाही.

[७] मतदारांस निवडणूक येणा-या उमेदवारांचा संख्येइतकी मते देण्याचा अधिकार राहिल. व ती सर्व मते प्रत्येकी एक या प्रमाणे विभागून द्यावीत.

[८] उमेदवारास अगर सभासदांस आपल्या मताचा प्रचार निवडणूक केंद्रापासून २५ फुटाच्या बाहेर करता येईल.

[९] ट्रस्ट मंडळ पांच सभासदांची निवडणूक पंच कमेटी मेंबरांची मध्ये नेमली जाईल. मात्र या सभासदांना निवडणूकीत भाग घेता येणार नाही.

[१०] घटनेच्या नियमाप्रमाणे व पध्दतीस अनुसरुन निवडणूका पार पाडणे व निर्णय [निकाल] जाहिर करणे हे या कमेटीचे कार्य राहिल.

[११] निवडणूकीचा कार्यक्रम निवडणूक पंच कमेटीने अशा रितीने योजावा की, वेळेवर निवडणूक घेतली जाऊन नवनिर्वाचित कार्यकारीणीस १ एप्रिलला चार्ज घेणे सुलभ होईल.

[१२] जितक्या जागा निवडून द्यावयाच्या, त्याचे ५०% पेक्षा कमी

...१८/–

सभासदाचे वैध नामनिर्देशन पत्र आल्यास ती निवडणूक प्रक्रिया रद्द समजुन ट्रस्ट मंडळाने कारभार बघावा, व त्यांनी ६ महिन्याचे कालावधीत निवडणूक प्रक्रिया सुरु करावी. निवडून द्यावयाच्या जागेपक्षा कमी मात्र ५०% पेक्षा अधिक वैध नामनिर्देशन पत्र आल्यास राहिलेल्या रिकाम्या जागा आमसभेत भरण्यांत येतील.

[१३] निवडणूकीचे कमीत कमी पांच दिवस अगोदर प्रत्येक उमेदवारास मतदानाचा नमुन्याचा फॉर्म देण्येत येईल.

[१४] निवडणूक संपल्यावर मतांच्या पेट्या सील करणे व त्या सुरक्षित जागी बंदोबस्तांत ठेवणे.

[१५] निवडणूकीबद्दल काही तक्रारी निर्माण झाल्यास निवडणूक पंच कमेटीचा निर्णय अखेरचा राहिल.

[१६] कार्यकारीणीच्या निवडणूकीच्या नॉमीनेशन फॉर्मची फी. रू. ५/- व डिपॉझीट रु. २५/- असे रू. ३०/- उमेदवारांस भरावे लागतील. ट्रस्ट मंडळाच्या जागे करिता फॉर्म फी रू. ५/- व डिपॉझीट रू. ३१/- राहतील.

[१७] शेवटच्या नंबराने निवडून आलेल्या उमेदवारांस मिळालेल्या मतापैकी १/२ मतापेक्षा कमी मते ज्या उमेदवारांना मिळतील. त्याचे डिपॉझीट जप्त झाले आहे असे समजण्यांत येईल.

[१८] निवडणूक पंच कमेटीने निवडून आलेल्या सभासदांची यादी तीन दिवसांचे आंत जाहिर करावी.

[१९] निवडणूक पंच प्रमुखाने नव्या कार्यकारी मंडळाची बैठक आपल्या अध्यक्षतेखाली ५ दिवसांचे आंत बोलवावी. व या बैठकीत कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करावी. मात्र या सभेत निवडणूक पंच प्रमुखाला मत देण्याचा अधिकार रहाणार नाही.

...१९/-

[२०] निवडणूक पंच कमेटीने निवडणूकीचा कार्यक्रम निवडणूकीच्या तारखेच्या अगोदर एक महिना जाहिर करावा.

[२१] संस्थेच्या कोणत्याही लोकसभा निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. व प्रचारही करता येणार नाही.

[२२] ज्या सभासदांचे नॉमिनेशन फॉर्म छाननीच्या वेळी संलग्न संस्थेची कुठलीही बाकी असेल. तर त्यास निवडणूकीस उभेरहाता येणार नाही. [बाकी – कबुल केलेली देणगी, पंच बाब, अधिकृत खात्यापोटी उचल किंवा इतर बाकी. ]

[२३] प्रत्येक सभासदाने संस्थेची जी सभासद फी असेल ती प्रत्येक वर्षी भरली पाहिजे.

[२४] संस्थेच्या कार्यक्षेत्रात जी [illegible] झाली असेल. अशा सभासदांस निवडणूकीस फक्त मतदानाचा अधिकार प्राप्त होईल.

भाग नववा.

घटना उपविधी दुरूस्ती.

[१] प्रचलित घटनेत काही गैरसोयी किंवा त्रुटी वाटू लागल्यांस कांही नियमांत दुरुस्ती करता येईल किंवा काही नियम रद्द करता येईल.

[२] घटना दुरूस्ती आमसभेच्या हजर सभासदांच्या २/३ मताधिक्याने करता येईल.

[३] घटना दुरूस्ती करण्यापूर्वी दुरूस्ती करावयाची शब्द रचना नोटीसीत नमूद करावयास पाहिजे. मात्र अशी सूचना सभासदांस किमान १५ दिवस अगोदर मिळाली पाहिजे.

[४] घटना दुरुस्तीचे बाबतीत ट्रस्ट मंडळ आपले विशेष अधिकार वापरु शकणार नाही.

-=-=-=-=-=-=-

[illegible]